सातारा, गुरुवार, ५ फेब्रुवारी
सकाळ

भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगांव

# 'रयत'च्या कार्याध्यक्षपदी डॉ. अनिल पाटील

## पुण्यात अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत निवड


डॉ. पाटील

सातारा, ता. ४ : रयत शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्षपदी संस्थेचे विद्यमान उपकार्याध्यक्ष डॉ. अनिल अप्पासाहेब पाटील यांची आज निवड झाली. संस्थेच्या वतीने याबाबतची माहिती देण्यात आली.

संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांचे निधन झाल्याने रिक्त झालेल्या जागेवरील निवडीसाठी आज औंध (पुणे) येथे संस्थेच्या विभागीय कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत मॅनेजिंग कौन्सिलची सभा झाली. त्यात डॉ. पाटील यांची निवड झाली. यावेळी मॅनेजिंग कौन्सिलचे सर्व सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

पान ७ वर ▶

### विश्वास सार्थ ठरवेन : डॉ. पाटील

**कर्मवीर अण्णांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या व विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी विशेष प्रयत्न करणार आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर नोकरी मिळाली पाहिजे, असे 'स्किल' त्यांच्यात निर्माण करणारे शिक्षण त्यांना द्यावयाचे आहे. संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत त्यांनी टाकलेला विश्वास मी सार्थ ठरवेन, अशी प्रतिक्रिया डॉ. पाटील यांनी निवडीनंतर व्यक्त केली.**

# 'रयत'च्या कार्याध्यक्षपदी डॉ. अनिल पाटील

▶ पान १ वरून

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू असलेल्या डॉ. पाटील यांच्या निवडीचे स्वागत करून सर्वांनी आनंद व्यक्त केला.

डॉ. पाटील एमबीबीएस आहेत. १९९० मध्ये ते संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य झाले. त्यानंतर १९९५ मध्ये संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनीचे अध्यक्ष झाले. प्रबोधिनीच्या माध्यमातून त्यांनी संस्थेत गुणवत्तावाढीसाठी विशेष लक्ष घातले. त्यासाठी त्यांनी विविध उपक्रम सुरू केले. क्रीडा अकादमी, नापासांची शाळा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे, रयत दृकश्राव्य निर्मिती प्रकल्प, गुरुकुल प्रकल्प असे विविध प्रकल्प सुरू करून त्यांनी विद्यार्थ्यांच्या व शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले. संस्थेतील सर्व महाविद्यालयांची गुणवत्ता सुधारण्यासाठीही त्यांनी काम केले. संस्थेच्या सर्व शाळा, महाविद्यालयांत संगणक शिक्षण देण्यासाठी 'केआयआयटी'ची स्थापना करून संगणक शिक्षणाची व्यवस्था केली. २००७ मध्ये त्यांची संस्थेच्या उपकार्याध्यक्षपदी निवड झाली.

दरम्यान, डॉ. पाटील हे १९७५ ते १९८० या कालावधीत सातारा नगरपालिकेचे सदस्य होते. तसेच त्यावेळी त्यांनी बांधकाम सभापती म्हणूनही काम पाहिले. पालिकेच्या शिक्षण मंडळाचे पाच वर्षे सदस्य होते. सातारा लायन्स क्लबचे १९७९ मध्ये ते अध्यक्ष होते. त्यावेळी त्यांना लायन्स इंटरनॅशनलचा बेस्ट प्रेसिडेंट म्हणून पुरस्कार मिळाला होता. शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवरही त्यांनी काम केले. विद्यापीठाच्या संगणक कोर्स अभ्यासक्रम समितीत ते मार्गदर्शक म्हणूनही काम करत आहेत.